

छाया: नलिन शाह

फिल्म इंडस्ट्रीने दुर्लक्षिलेले ऐ मेरे प्यारे धवन

अफाट प्रतिभा असणाऱ्या कित्येक कलाकारांची फिल्म इंडस्ट्रीत कदर झाली नाही. त्यात प्रेम धवनही होते...

□ अजित पोपट

मन्ना डेचा स्टेज शो जगभरात कुठेही असो, एक गाणं गायला त्यांना हमखास सांगितलं जातं. ते गीत मन्ना डेसोबत श्रोत्यांनाही अश्रू गाळायला लावतं. ते गीत म्हणजे *काबुलीवाला*मधील 'ऐ मेरे प्यारे वतन, ऐ मेरे बिछडे चमन, तुझ पे दिल कुर्बान, तू ही मेरी आरजू, तू ही मेरी आबरू, तू ही मेरी जान...'

गीतातील भाव आणि शब्द वाचून कुणालाही हे गीत प्रदीपजींचं वाटेल. पण हे गीत प्रेम धवनचं आहे. त्यांची जीवनज्योत सोमवारी ७ मेला मालवली. ते केवळ गीतकार नव्हते तर चांगले गायक, संगीतकार आणि नर्तकही होते. मात्र ते संगीतालाच प्रथम स्थान द्यायचे.

राज कपूरच्या *जागते रहो* (१९५६) मध्ये एका गरीब खेडुताला प्यायला पाणी हवं असतं. मिनी भारत नावाच्या सोसायटीत तो पाणी पिण्यासाठी जातो. तेव्हा त्याला रात्रभर विचित्र अनुभव येतात. अखेर पहाटे नर्गिस देवाची पूजा करत असताना या खेडुताला प्यायला पाणी मिळतं. एवढीच या चित्रपटाची कथा आहे. या चित्रपटाचे संगीतकार प्रेम धवनच होते. *काबुलीवाला*चे संगीतकार सलील चौधरी होते. दूरदर्शनच्या मुलाखतीत सलील चौधरी यांनी एक गुपित उघडं केलं होतं. ते म्हणाले होते, 'ये मे झूठ बोलिया कोईना भाय कोईना...' हा पंजाबी भांगडा प्रेम धवनजींनीच लिहिला. एवढंच नाही तर त्याला संगीतही त्यांनीच दिलंय. पण क्रेडिट मला मिळालं. राजसाहेबांना माझ्या कम्पोझिशनपेक्षा प्रेमजींचं कम्पोझिशन चांगलं वाटलं.'

प्रेम धवन, दीनानाथ मधोक आणि प्रदीपजींसारखेच कविता, संगीत आणि नृत्याचे जाणकार होते. प्रेम धवन जे गीत लिहायचे त्याची चालही तयार करायचे. संगीतकाराला ते गाण्याची चालही गाऊन दाखवत. त्याचं यश संगीतकाराला मिळालं तरी गीताला योग्य न्याय मिळाल्याचं समाधान त्यांना मिळायचं.

प्रेम धवन यांचा जन्म १३ जून १९२३मध्ये झाला. कुटुंबात सर्वच सुशिक्षित आणि सुसंस्कृत होते. त्यांची आई चांगली लोकगीतं गायची. स्वातंत्र्यलढ्याचा प्रभाव धवन कुटुंबावरही पडला होता. प्रेम धवन यांचे मामा स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झाले होते. काही काळ ते ब्रिटिशांच्या कैदेतही होते. छोट्या प्रेमला त्याची आई महात्मा गांधी, सुभाषचंद्र बोस, शहीद भगतसिंग आणि चंद्रशेखर आझादच्या शौर्यकथा ऐकवायची. याचा प्रभाव प्रेमवर पुरेपूर पडला होता. म्हणून पुढे जेव्हा चंद्रशेखर आझाद आणि शहीद भगतसिंग या चित्रपटाला प्रेमनी गीत-संगीत दिलं तेव्हा त्यांची देशभक्तीची आणि प्रभुभक्तीची गीतं प्रदीपजींसारखीच प्रभावी झाली.

त्यांची देशभक्तीपर गीतं आजही मन हेलावून टाकतात. ती गाणी म्हणजे, 'ऐ वतन ऐ वतन, मुझको तेरी कसम, तेरी राहों में जा तक बिछा देंगे हम...' आणि 'मेरा रंग दे बसंती चोला, माही रंग दे बसंती चोला...' मुकेश आणि कोरसच्या आवाजातील हे गाणं कोण विसरेल? 'छोडो कल की बाते, कल की बात पुरानी नई उमंगे लिये ढंग में मिलकर नई कहानी हम हिंदुस्तानी, हम हिंदुस्तानी...'

प्रेम धवन लाहोरच्या एफ. सी. कॉलेजमधून ग्रॅज्युएट झाले. ते १९४३मध्ये मुंबईत आले. तेव्हा तलत महेमूद आणि मुकेशसारखी त्यांचीही हिरो बनण्याची इच्छा होती. पण त्यावेळी चॉकलेट हिरोंची रेलचेल होती. म्हणून त्यांचा

नंबर लागला नाही. मग ते नृत्यशिक्षक उदय शंकर यांच्याकडे भारतीय नृत्य शिकले. पंडित रवी शंकरकडे ते सितार वाजवायलाही शिकले. सुदैवाने प्रेम धवनना संगीतकार रवी, एस. एन. त्रिपाठी आणि चित्रगुप्तसारखे चांगले मित्र मिळाले. त्यांनी त्यांना गीत-संगीतातच कारकीर्द करायला सांगितली. प्रेम धवननीही त्यांचं ऐकलं आणि १९४५ ते १९७५ या कालावधीत त्यांनी ३००पेक्षा अधिक चित्रपटांची गीतं लिहिली. तसंच सहाएक चित्रपटांना संगीतही दिलं. ते समाजवादी विचारांचे होते. इप्टासारख्या समाजवादी संस्थेच्या ते संपर्कात होते.

अनू मलिकचे वडील सरदार मलिकचे प्रेम धवन चांगले मित्र होते. 'जी'ने त्यांना प्रेम धवनबाबत विचारताच सरदार मलिक म्हणाले, 'अब क्या पूछना है प्रेम धवन के बारे मे, वो तो चले गये. हयात असताना त्यांची कुणीही कदर केली नाही. आणि आता ते गेल्यावर त्यांच्याविषयी विचारणा करणारे फोन येत आहेत. कितना बेकदर जमाना है...'

यावर 'जी'ने म्हटलं: 'असं कसं म्हणता? *टीव्ही एस सारेगामा* कार्यक्रम सोनू निगम करायचा तेव्हा त्या कार्यक्रमाच्या फायनलची कव्हर स्टोरी 'चित्रलेखा'ने केली होती. त्याचवेळी सेटवर प्रेमजी भेटले होते. त्यांना मुलाखत द्यायची विनंती केली. पण प्रेमजी म्हणाले, 'अब मै रिटायर हो चुका हूं' आणि त्यांनी नम्रपणे मुलाखत द्यायचं टाळलं.'

तेव्हा सरदार मलिक म्हणाले, 'उसकी एक कमजोरी थी. उसको पी. आर. वर्क नही आता था. बाकी वो जिनियस था जिनियस. वो अंतर्मुख था. प्रेस-पब्लिसिटी से दूर रहता था. और फिर थोडा नसीब ने भी उसे साथ नही दिया. वरना वो क्या लिखता था.'

सरदार मलिकांचं म्हणणं बरोबर आहे. प्रेम धवन देशप्रेम, भक्ती आणि खेळकर गीतांचे राजा होते. सरदार मलिक आणि त्यांच्या इतर मित्रांच्या म्हणण्याप्रमाणे प्रेम धवनची हयात असताना खरोखर योग्य कदर झाली नाही.

सामाजिक गीताबद्दल म्हणायचं, तर संगीतकार रवी नजरेसमोर येतात. रवीही गीतकार आणि गायक होते. देवेंद्र गोयलचा *चिराग कहा रोशनी कहा* (१९५९) बनत होता तेव्हा त्याचं शीर्षक गीत चांगलं असावं असा सर्वांचा आग्रह होता. रवीनी प्रेम धवनना चित्रपटाची कथा सांगितली. प्रेम धवननी

> प्रेम धवन की एक कमजोरी थी. उसको पी. आर. वर्क नही आता था. बाकी वो जिनियस था जिनियस. थोडा इन्टोवर्ट (अंतर्मुख) था. प्रेस-पब्लिसिटी से दूर रहता था. और फिर थोडा नसीबने भी उसको साथ नही दिया.
>
> — सरदार मलिक

यावर एक चांगलं शीर्षक गीत लिहिलं. 'अजब है मालिक तेरा जहां चिराग कहां, रोशनी कहां...' अशी भरपूर उत्कृष्ट गाणी प्रेम धवनी लिहिली.

त्यापैकी १९५९ मधील रवींद्र दवे दिग्दर्शित *गेस्ट हाऊस* चित्रपटातील 'झूठ का दीपक कभी नही जलता सांज को आंच नही प्यारे...' आणि *पवित्र पापी*मधील 'तेरी दुनिया से चला जाऊंगा बहोत दूर...' ही गाणी खासच आहेत.

प्रसिद्धीपासून दूर राहणाऱ्या आणि स्वभावाने गंभीर असलेल्या प्रेम धवननी काहीं खेळकर गाणीही लिहिलीत. १९६३मधील *राजा* चित्रपटातील 'किली किली किली, पहले आई मूर्गी की पहले आया अंडा...' हे गाणं जगदीपवर चित्रित झालंय. तसंच *अपलम चपलम*मधील 'अपलम चपलम...', *टॅक्सी ५५५*मधील 'बलम मेरे बन गये जन्टलमन...' ही गाणीही प्रेम धवननी लिहिलीत. त्यांच्याबरोबर १९६२मधील *बनारसी ठग* या चित्रपटातील 'सुन सुन मेरे भाई ये रुपया आना पाई, सब माया है...' हे गाणंही प्रेम धवननीच लिहिलं. या चित्रपटाचा हिरो मनोजकुमार होता. या चित्रपटापासूनच प्रेम धवन आणि मनोजकुमारची मैत्री जमली. आणि मग शहीद चित्रपटाचं बीज इथेच रोवलं गेलं.

*पिकपॉकेट*मध्येही असंच एक गाणं आहे. त्याला संगीत सरदार मलिकनी दिलंय.

'आगे पीछे दाये बाये
ओ गोरी जरा थम के चलो
दिल को थामे भरते आहे
पडे है आशिक हाय...'

देवेंद्र गोयलचा चित्रपट *दस लाख*मध्येही प्रेम धवनचं गाणं आहे. त्याला संगीत रवीनी दिलंय.

'ओ दुदु ओ नी नी नी, ओ या या या,
दुनिया उसकी है, जिसके पास है रुपैया...'

प्रदीपजींच्या स्टाईलमधील उत्साहवर्धक गाणीही प्रेम धवननी लिहिलीत. त्यात 'छोडो कल की बाते...' (*हम हिंदुस्तानी*), 'वह कौन सी मुश्कील है जो न हो सके आसान, हिंमत है तेरे साथ तो फिर साथ है भगवान...' (१९६२मधील *मा-बेटा*) हे गाणं महंमद रफीने गायलंय.

मुकेशच्या काही यादगार गीतांतही प्रेम धवनचा वाटा आहे. उदाहरणार्थ- सदा खुश रहे तू जफा करनेवाले...' (*प्यार का सागर*, संगीतकार- रवी), 'मुझे मुबारक पुरानी यादें...' (झलक), *बडी बहू*साठी अनिल विश्वासने प्रेम धवनकडून दोन सुंदर गाणी लिहून घेतली. 'जमाने का दस्तुर है ये...' आणि 'काहे नैनों मे कजरा भरो...' ही ती दोन गाणी.

प्रेम धवननी जवळजवळ ३०० चित्रपटांसाठी गाणी लिहिली. त्यातले बरेचसे चित्रपट बी आणि सी ग्रेडचे होते. पण प्रेम धवनच्या गीतांचा दर्जा उच्च होता. ते कामाच्या बाबतीत चोख होते. १९७०मध्ये त्यांना पद्मश्री पुरस्कार मिळाला. तेव्हा मनोजकुमार म्हणाला, 'माझ्या शिफारशीने हा ॲवॉर्ड त्यांना मिळालाय.'

गीता दत्तने गायलेली काही हळवी गीतंही प्रेम धवनची होती. उदाहरणार्थ- 'बीबीजी, मैने कहा जी, ये मौसम है सुहाना...' (*मिलन*-१९५७), 'घरवाले घर वही, हमे किसाका डर नही हस लो गालो धूम मचाओ...' (*प्यार की राहें*-१९५८), 'थोडी थोडी गोरी है थोडी थोडी काली है, छोरिया आजकी नखरेवाली है...' (*सुपरमॅन*-१९६०)

या अनोख्या कलाकाराने विजय भट्टच्या *गुंज उठी शहनाई*मध्ये नृत्य दिग्दर्शनही केलं होतं. पण ते स्वभावाने इतके नम्र आणि साधे होते. की रस्त्याने जाताना कुणाला कळणारही नाही की ते प्रेम धवन आहेत. ७८व्या वर्षी प्रेम धवन स्वर्गवासी झाल्यानंतर त्यांच्या अंत्ययात्रेला चित्रपट विश्वातील फार थोडेच लोक उपस्थित होते. ते पाहून प्रेम धवनचंच *दस लाख*मधील गाणं आठवतं – 'अजब तेरी कारागिरी रे करतार...'

त्यांच्या मागे त्यांच्या कुटुंबात त्यांची पत्नी श्यामली आहे. 'जी' परिवार प्रेम धवनच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहे. ●